महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
CIN: U40109MH20055GC153645

दु. क्र. (का.) : २६४७४२११, २६४७२१३१
फॅक्स : ०२२-२६४७२९३७
Email : cedist.msedcl@gmail.com
Website : www.mahadiscom.in

प्लॉट क्र.जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

---

क्र. मु.अ.(वितरण)/डी-४/ No 39028 दिनांक : 10 NOV 2015

**परिपत्रक**

**विषय:** पंचायत / ग्रामपंचायत कार्यालयात महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांची नांवे व भ्रमणध्वनी क्रमांक असलेले फलक लावणेबाबत.

**संदर्भ:** मा. ऊर्जा मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, मंत्रालय, मुंबई यांची आढावा बैठक विषय सुची पत्र दि. ०७.११.२०१५.

महावितरण ही व्यावसायिक कंपनी असून सर्व वीज ग्राहकांना खात्रीचा व दर्जेदार वीज पुरवठा स्पर्धात्मक आणि रास्त दराने देण्यासाठी तसेच महाराष्ट्र राज्याच्या कृषी, औद्योगिक व सर्वांगिण विकासाला चालना देण्यासाठी कटीबध्द आहे. ग्राहकांच्या हितासाठी तांत्रिक सर्वोत्तमता आणि वित्तीय परिपूर्णता आणण्यासाठी वीज वितरण प्रणाली मध्ये सुधारणा करणे, प्रतिबंधात्मक देखभाल व उपाययोजना आखणे, वीज चोरीला आळा घालणे, वीजेचा योग्य वापर करुन जनतेच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी सामाजिक बांधिलकी म्हणून काम करीत आहे.

महावितरण कंपनीच्या स्थानिक कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांच्याशी सहज संपर्क व्हावा जेणेकरुन अचानक उद्भवण-या वा निर्माण होणा-या घटनेचा/ अडचणीचा व वीज समस्येचा निपटारा त्वरीत होण्यासाठी मदत मिळेल व त्या द्वारे जनमानसात लोकाभिमुख प्रशासनाची प्रतिमा तयार होईल. या करिता पंचायत व ग्रामपंचायत कार्यालयात महावितरण कंपनीच्या स्थानिक कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांची नांवे व भ्रमणध्वनी क्रमांक असलेले फलक लावण्यात यावेत.

सर्व संबंधितांना या परिपत्रका द्वारे निंदेश देण्यात येत आहेत की, आपल्या कार्यक्षेत्रातील पंचायत व ग्रामपंचायत कार्यालयात विभागीय, उपविभागीय व शाखा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची नांवे, पदनाम व भ्रमणध्वनी क्रमांक तसेच कार्यालयीन पत्ता व दूरध्वनी क्रमांक नमूद केलेले फलक लावण्यात यावेत.

सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

**मुख्य अभियंता (वितरण)** करीता

**प्रत सादर :**

सर्व अधिक्षक अभियंता मंडल कार्यालये.